# पुण्यातील शिक्षक कधी बदलणार?

मी, १९६२ साली माझ्या पदव्युत्तर शिक्षणासाठी पुण्यामध्ये प्रवेश केला तेव्हा पुण्याची ख्याती ‘विद्येचे माहेरघर’ अशी होती. इतर अनेक शहरांपेक्षा, मोठया गावांपेक्षा पुण्यामध्ये विविध प्रकारच्या शिक्षणाच्या संधी खूप होत्या. येथील शाळा-कॉलेजांचा दर्जाही जास्त चांगला आहे, अशी दृढ समजूत होती. पुण्याबाहेरून केवळ शिकण्यासाठी म्हणून अनेक विद्यार्थी येऊ लागले होते. त्यात जसे पुण्याच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागांतून विद्यार्थी येत असत तसेच, नव्याने, महाराष्ट्रातील अन्य जिल्हयांमधूनही येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत जात होती. त्यामुळे आपल्या वर्गात वेगवेगळया ठिकाणच्या विद्यार्थ्यांशी मैत्री होण्याच्या संधी आपसूकच मिळत असत. आणखीही एक गोष्ट, तत्कालीन ह्या विद्येच्या माहेरघरात होती; ती म्हणजे, आपले शिक्षण कोणत्याही बाह्य अडथळयांविना, शांततेने पार पडत असे. शिक्षकांच्या कामगार संघटना बहुधा नसाव्यातच. विद्यार्थ्यांच्याही संघटना नव्हत्या. विद्यापीठांतील कुलगुरूंपासून ते व्याख्यांत्यांपर्यंतच्या व्यक्तीविषयी बाहेरच्या जगात काही उणे दुणे ऐकू येत नसे. त्यांच्याविषयी, त्यांच्या शिकविण्याविषयी, त्यांच्या विषयांतर्गत विद्वत्तेविषयी एक आदराची भावना सतत मनात असे. आपण कुणाकडून शिकत आहोत, शिकलो आहोत याला विद्यार्थ्यांच्या मनांत आणि क्वचित नोकरीच्या बाजारांतही महत्त्व असे. महाविद्यालयांत विद्यार्थी रोज जात असत, वर्गांत बसत असत, तेथेच शिकत असत. कुठे क्लासला जाण्याची गरज नसे, उलट लाज वाटत असे.

त्यावेळचे पुणे आजच्यापेक्षा खूप लहान होते आणि आजचे लहान रस्ते त्यावेळी खूप रूंद वाटत असत. रस्ते विद्यार्थ्यांच्या आणि चाकरमान्यांच्या सायकलींनी गजबजलेले असत. त्यात क्वचित धावणाऱ्या मोटरगाडया खास उठून दिसत असत. पण, आत्ता हे विद्येचे माहेरघर वाढत्या शिक्षणसंस्थांनी, वाढत्या विद्यार्थी संख्यांनी आणि वाढत्या गर्दीनी गजबजले आहे. आता शेजारच्या गावांमधूनच नव्हे तर शेजारच्या व दूरदूरच्या राज्यांमधून आणि परदेशांतूनही विद्यार्थी येथल्या शिक्षणगंगेत स्नान करून पदवी पवित्र होऊन जात आहेत. पण एवढेच नाही. प्रत्यक्षात ही शिक्षणगंगाच बदलून गेली आहे; दुषित झाली आहे असा प्रत्यय पदोपदी येतो. आपण काही उदाहरणे पाहू या.

एका इंग्रजी माध्यमाच्या केजी(‘केजी’ म्हणजे काय हे तिथल्या शिक्षिकेला/मॅडमला सांगता आले नाही!) शाळेत गेलो होतो. दीड-दोन तास तेथे होतो. वर्गात बेंचवर मुले गर्दी करून बसली होती. त्यांचे पाय लोंबकळत

होते. त्या लोंबकळणाऱ्या पायांखालीच त्यांची दप्तरे (डबे, पाण्याची बाटली यांच्या सहित) ठेवलेली होती. पायात बूट-मोजे आणि गळयात लंगोटी होतीच. मुलींनाही हल्ली टाय लावतात ! हे कपड्यांचे अनावश्यक, अशैक्षणिक लोण सेमी-इंग्लिशवाल्या आणि थेट महानगरपालिकेच्या शाळांपर्यंत पोचले आहे. हा नव्या वर्षाचा दुसरा-तिसराच दिवस होता, आणि शिक्षिका फळयावर 'एबीसीडी' लिहून मुलांना आपल्या वह्यांवर लिहायला आणि घोकायला सांगत होती. ज्या वयात लेखन-वाचनाची शारीरिक व मेंदू विषयक तयारी झालेली नसते त्या वयात ती गोष्ट लहान बालकांवर लादणे म्हणजे, मेंदूवर अनाठायी आघात करून, मुलांचे अतोनात नुकसान करणे होय ! तासाभराने मुला-मुलींना नीट ओळीत बाहेर काढून ' शू' करायला नेले. नियम असे की जाताना व येताना ओळीतच असायचे, विद्यार्थ्यांनी एकमेकांना हात लावता कामा नये, एकमेकांशी बोलायचेही नाही. शिस्तीत जायचे-शिस्तीत यायचे. मी हे अघटित दृष्य पाहत होतो. एका चार वर्षांच्या मुलाने दुसऱ्या मुलाच्या खांद्यावर क्षणभर हात ठेवला आणि खाडकन हातावर वॉचमनची छडी बसली ! असली ही जीवघेणी शिस्त आणि शिक्षा पहिल्यापासूनच मुलांच्या मनांत शिकण्याची भीती निर्माण करते, आणि पालकांच्या हाती,आपल्या नैसर्गिकतेने शिकणारी, उत्साही, जिज्ञासू मुले राहत नाहीत तर मनाची कवाडे बंद केलेली, इंग्रजी शब्दांची पोपटपंची करणारी, भित्री, शिकण्याचा कंटाळा येणारी मुले राहतात. मुलांचे शिक्षण शिस्तीत, शिक्षेत, परीक्षेत आणि स्पर्धेत बंदिस्त करून ठेवणाऱ्या शाळा या सार्वत्रिकरीत्या आणि भरपूर पैसे घेऊन मुलांचे अतोनात नुकसान सुरुवातीपासूनच करतात. शास्त्रीय बालशिक्षण काय असते हे न समजणाऱ्या अनेक बालशाळा आज पुण्यामध्ये गर्दी करून आहेत.

संगणक ही आजच्या काळाची गरज आणि फॅडही आहे. ' संगणकाधारित बालवाडी ' अशीही पाटी एकदा मी कुठेतरी पाहिली होती. मुलांसमोर संगणक आणला की लगेच आपण मुलांना अत्याधुनिक शिक्षणाशी जोडतो आहोत, असा भास शिक्षणसंस्थांना होतो; संगणक केव्हा मुलांच्या शिक्षणात आणावा, कसा आणावा, संगणकाचे वयोमानानुसार शिक्षण कसे घ्यावे याची मुळाक्षरे न गिरवताही जेव्हा केवळ जाहिरातीसाठी संगणक आणला जातो तेव्हा तो शिकणाऱ्या छोटया मुलांना ताण निर्माण करणाराच ठरतो.

पुणे महानगरपालिकेच्या एका संगणकयुक्त शाळेतील ही तऱ्हा. तेथील संगणककक्ष दाखविण्यासाठी खास करून मला नेण्यात आले. मी पाहिले ते असे : तिसरीतील चिमुकल्या मुली एकेका संगणकासमोर स्टुलांवर बसल्या आहेत. त्यांच्यासमोर टेबलावर ठेवलेला संगणक त्यांच्या मानाने उंचावरच आहे. संगणकावर एक पुस्तकाचे पान दिसते आहे, आणि या चिमुकल्या मान उंचावून त्यावरील एक एक शब्द जवळच्या वहीत उतरवून घेत आहेत. मी तेथील संगणक शिक्षिकेला विचारले, हे काय चालले आहे ? शिक्षिका म्हणाली, त्यांची

पुढील आठवड्यात संगणकाची परीक्षा आहे; त्यासाठी त्या ही माहिती उतरवून घेत आहेत. मी म्हटले, मग संगणकाऐवजी पुस्तकातून ती उतरवणे अधिक सोपे नाही का? शिक्षिकेकडे उत्तर नव्हते. पुन्हा इतर सर्व विषयांप्रमाणेच संगणकाचे शिक्षण सुध्दा कंटाळवाणे करण्याचा शाळांनी नि त्यांच्या शिक्षकांनी विडाच उचलला आहे जणू !

मी, अलीकडेच पुण्यातील एका मान्यवर माध्यमिक शाळेत जाऊन आलो. सध्या, अत्यंत निरर्थक अशैक्षणिक गोष्टींचे ( पुन्हा शिस्तीच्या नावाने ) पेंव फुटले आहे. उदाहरणार्थ, मी वर्गात शिरल्यावर उभे राहून सर्व विद्यार्थी म्हणाले, ‘एकसाथ नमस्ते ’ वास्तविक, या दोन शब्दांमधील पहिला शब्द ही एकाने देण्याची आज्ञा असून दुसरा शब्द सर्वांनी एकत्र म्हणण्यासाठी ती दिलेली आहे. परंतु हे न समजता सर्वच विद्यार्थी एकदम ‘ एकसाथ नमस्ते ’ असे म्हणतात. शिक्षिकांनाही यात काही चूक आहे असे आजवर कधी वाटलेले नाही ! यावेळी मी विद्यार्थ्यांसमोर छोटेसे भाषण केले. नंतर सर्व विद्यार्थ्यांनी मिळून एका विशिष्ट लयीत नऊ टाळया वाजवल्या. म्हणजे टाळया सुध्दा उत्स्फूर्ततेने  वाजवायला इथे बंदी केली आहे. मुलांचे स्वातंत्र्य किती बंदिस्त केले जाते आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्तता कशी मारली जाते याचे हे टोकाचे पण सार्वत्रिक उदाहरण आहे. अति शिस्तीच्या, बेगडी संस्कारांच्या कल्पनांनी आपले सारे शालेय शिक्षण अत्यंत कृत्रिम , कंटाळवाणे , विद्यार्थ्यांची नैसर्गिकता मारणारे, विद्यार्थ्यांना धड्यांखालील प्रश्नोत्तरातच अडकवून त्यांची स्वतंत्र विचारशक्ती मुळातच दडपून टाकणारे, निबंधसुध्दा मुद्यांनुसार लिहायला लावून विद्यार्थ्यांची स्वतंत्र कल्पनाशक्ती मारणारे, शिस्त, शिक्षा, साधी बक्षिसे आणि परीक्षा ह्या पंचमहाराक्षसांनी नासवलेले आणि विद्यार्थ्यांची ऐन उमेदीची अनेक वर्षे घालवून त्यांच्या पदरी फारसे काही न पडणारे असे हे शिक्षण, सध्या पुण्यातील बहुसंख्य शाळा देताहेत.  शाळा शिक्षकांना आणि शाळाचालकांना आपले फार मोठे चुकत आहे याची जाणीवही नसते ही खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. निदान, पुण्यातच काही शाळा, विद्यार्थ्यांना स्वतंत्रतेच्या वातावरणात, त्यांच्या जिज्ञासेला खतपाणी घालत, करून शिकण्याची संधी देत, बंदिस्ततेकडून मुक्ततेकडे वळलेल्या अशा आहेत. त्यांच्याकडून अनेक पारंपारिक शाळांना खूप काही शिकण्यासारखे आहे. परंतु आपण काही नव्याने शिकावे, असा मनमोकळेपणाही बहुसंख्य शाळांच्या चालकांकडे नाही. न बदलणारे शिक्षक आणि न शिकणारे संस्थाचालक, असा हा सारा मामला आहे.

केंद्र सरकारने आणि महाराष्ट्र शासनाने, पारंपारिक ‘ वर्तनवादी ’ शिक्षणाच्या जागी ‘ ज्ञानरचनावादी ’ शिक्षण गेल्या चार वर्षांपासून आणले आहे. परंतु याची काही माहिती पुण्यातील खाजगी शाळांपर्यंत पोचलेली दिसत नाही; किंवा पोचूनही शाळा आपल्या जुन्या मस्तीतच दंग असाव्यात. आज पुणे जिल्ह्यातल्या, जवळच्या

वाई-सातार्‍यातल्या जिल्हा परिषदांच्या अनेक शाळा, पुण्यातल्या कितीतरी शाळांच्या खूप पुढे आहेत. त्यांनी ‘ विद्यार्थीकेंद्री ’ शिक्षणाची वाट चालायला केव्हाच सुरुवात केली आहे. या शाळा इतके चांगले शिक्षण देऊ लागल्या आहेत की, पालक आपल्या इंग्रजी माध्यमात घातलेल्या मुलांना काढून चक्क या जिल्हा परिषदांच्या शाळांतून घालू लागले आहेत.

पुण्यातील घट्ट विणीच्या खाजगी शाळा त्यातही प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळा केव्हा बदलणार, केव्हा नव्या शास्त्रीय विद्यार्थीकेंद्री शिक्षणाकडे वळणार हा पुणेकरांपुढचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हल्ली महाविद्यालयांच्या नद्या ओस पडल्या आहेत. विद्यार्थी वर्गांत बसत नाहीत, नि व्याख्यात्यांना व्याख्याने द्यावी लागत नाहीत. आजूबाजूचे क्लासेस मात्र दुथडी भरून वाहत असतात. मग महाविद्यालये बंद का करू नयेत ?

मी १९६२ साली पुण्यात शिकण्यासाठी आलो तेव्हा येथील शाळा, तत्कालीन पध्दतींनुसार अत्याधुनिक होत्या; आणि पुणे हे विद्येचे माहेरघर होते. आज ५०/५५ वर्षांनंतर येथील शाळा आजच्या काळाला अनुसरून अत्याधुनिक झालेल्या नाहीत. आणि पुणे हे ‘ विद्येचे मारघर ’ बनायला वेळ लागणार नाही असे वाटू लागले आहे. अर्थातच या करामतीत इंग्रजी माध्यमाच्या अनेक शाळा पुढे असतील !

❖